# ब) निर्यात विभाग

निर्यात विभागांतर्गत शेतक-यांसाठी निर्यातक्षम उत्पादनात वाढ होणेकरीता कृषि विभाग, सहकार विभाग, कृषि विद्यापिठ व स्थानिक बाजार समिती यांचे सहकार्याने ग्रामिण भागात सतत प्रशिक्षण कार्यक्रमांचे माध्यामातून पॅकेजिंग,प्रशीतकरण,शीतगृह,वाहतूक व कृषिमालाचे काढणी पश्चात आवश्यक प्रक्रिया या विषयासंदर्भात शेतकरी व त्याच्या संस्थाना मार्गदर्शन करण्यात आले आहे.आज अखेर ७२२ प्रशिक्षण कार्यक्रमांचे माध्यामातून ४६५८९ शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. कृषि मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ.साठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे, निर्यात सुविधा केंद्र तसेच प्रशितकरण आणि शितगृहांची उभारणी करणे, शेतकरी, बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशिल आहे.

कृषि पणन मंडळामार्फत कृषि मालाच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत विविध देशातील आयातदार शोधणे, विविध फळे व प्रक्रियायुक्त पदार्थांचे नमुने विविध देशातील आयातदारांना पाठविणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये सहभागी होऊन महाराष्ट्रातील कृषि माल व प्रक्रियायुक्त उत्पादनांसाठी नवीन बाजारपेठांचे शोध घेणे तसेच कृषिमालाचे निर्यातीसाठी उत्पादक शेतक-यांना व सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्याचे काम कृषि पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाचे सुविधा केंद्रातून अमेरिका, आखाती देश व न्यूझीलंड या देशांना हापूस व केशर आंब्याची निर्यात करण्यात आलेली असून सध्या कृषि पणन मंडळामार्फत डाळींब, केळी, संत्रा, कांदा, आंबा पल्प, काजू इ. च्या निर्यातीबाबत प्रयत्न करणेत येत आहेत.

## निर्यात वृध्दीकरीता पायाभूत सुविधांची उभारणी :

राज्यामध्ये उत्पादीत होणा-या विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यामध्ये हापूस आंबा, केशर आंबा कांदा, संत्रा, केळी डाळिंब या उत्पादनांकरिता कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना करण्यात आलेली असून, सदर कृषि निर्यात क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नोडल एजन्सी या नात्याने कृषि पणन मंडळामार्फत विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातीसाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आलेली असून, अहवाल वर्ष अखेर कृषि पणन मंडळामार्फत उभारण्यात आलेल्या निर्यात सुविधा केंद्रांचा तपशील पुढीलप्रमाणे :

## १) निर्यात सुविधा केंद्रे:

सुगी पश्चात कृषिमालाची होणारे नुकसान कमी हेण्याच्या दृष्टीने व विविध आयातदार देशांच्या मागणीचा विचार करता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने काळाची गरज लक्षात घेता निर्यातीसाठी आवश्यक पायाभुत सुविधांची उभारणी अपेडा, राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वत: चा अतीरीक्त निधी वापरुन स्थानिक सहकारी संस्था व बाजार समिती यांचे सहकार्याने राज्यात सर्वदुर निर्यात सुविधा केंद्र व आधुनीक फळे व भाजीपाला सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. अपेडा, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राज्यात १३ ठिकाणी राज्यातील कृषि मालाला चालना मिळण्यासाठी व शेतक-यांच्या

कृषि मालास चांगला दर मिळवुन देण्यासाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आलेली आहे. यासाठी रु. ५६.५२ कोटी इतकी गुंतवणुक करणेत आलेली आहे. ज्यायोगे शीतगृह क्षमता ६०५ मे.टन , प्रशितकरण ६१० मे.टन व रायपनींग चेंबर ७० मे.टन इतकी क्षमता निर्माण झालेली आहे. या सुविधांचा वापर करून आतापर्यंत सुमारे ४४,५३७ मे.टन कृषिमालाची हाताळणी व प्रक्रीया या केंद्राचे माध्यमातून करण्यात आलेली आहे. या सुविधा केंद्रांमधुन आंबा, कारले, डाळींब, केळी इ.फळे व भाजीपाल्यावर प्रक्रीया करुन अमेरीका, आखाती देश, जपान व युरोपीय देशांमध्ये निर्यात करणेत आली आहे.

सद्यस्थीतीत कार्यरत असलेल्या निर्यात सुविधा केंद्र येथील फळे, भाजीपाला व फुले प्रक्रीयेचा तपशील खालीलप्रमाणे आहे ;

## सुविधा केंद्र वापर – सन २०१३-१४

| अ.क्र. | सुविधेचे नाव | देश | प्रक्रीया (मे.टन) |
|---|---|---|---|
| १. | व्हिएचटी सुविधा केंद्र वाशी नवी मुंबई , | युरोपिय देश, आखाती देश | ५०५०.०० |
| २. | डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे | युरोपिय देश, आखाती देश | ७८.०५ |
| ३. | शेतमाल निर्यात सुविधा केंद्र, इंदापुर जि. पुणे | | ०.०० |
| ४. | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, इंदापुर जि. पुणे | आखाती देश | ६१४.९३ |
| ५. | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र,जामसंडे जि. सिंधुदुर्ग | अमेरिका | १०.०० |
| ६. | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र,नाचणे जि.रत्नागीरी | अमेरिका | ३७५.६५ |
| ७. | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना जि. जालना | | १.३१ |
| ८. | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, लातुर | | १६५.०० |
| ९. | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा घा जि.वर्धा | | ०.०० |
| १०. | निर्यात सुविधा केंद्र तळेगाव, जि.पुणे | युरोपिय देश | २७,५५,००० (गुलाब स्टेम्प्स) |
| ११. | कांदा व डाळींब निर्यात सुविधा केंद्र, कळवण जि. नाशिक | | ०.०० |
| १२. | केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा, जि. जळगांव | | ०.०० |
| १३. | केळी निर्यात सुविधा केंद्र, बसमत, जि. हिंगोली | | ० |

२) तसेच राज्यात नवीन निर्यात सुविधा केंद्र व आधुनीक फळे व भाजीपाला सुविधा केंद्राची उभारणी करण्यात येत असुन ज्यायोगे राज्यामध्ये ९७५ मे.टन शीतगृह क्षमता, प्रशितकरण १३५ मे.टन व रायपनींग

चेंबर ७५ मे.टन इतकी क्षमता निर्माण होणार असुन फळे व भाजीपाल्याकरीता काढणी पश्चात हाताळणीद्वारे निर्यात व स्थानिक विक्री व्यवस्थेकरीता बहुतांशपणे सुविधा माहे जानेवारी २०१५ अखेर कार्यान्वीत होणार आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे;

| **अ.क्र.** | **सुविधा** | **संख्या** |
|---|---|---|
| १. | निर्यात सुविधा केंद्र | १३ |
| २. | आधुनीक फळे व भाजीपाला सुविधा केंद्र | २० |
| ३. | निर्यात सुविधा केंद्र (नवीन) | ८ |
| ४. | फुले निर्यात सुविधा केंद्र | ४ |
| | **एकुण** | **४५** |

## अहवाल वर्षात कामकाज प्रगतीपथावर/पुर्ण झालेले/नियोजित असलेले प्रकल्प

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत निर्यातीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी अपेडा, नवी दिल्ली, राष्ट्रीय कृषि विकास योजना ,स्थानिक सहकारी संस्था व बाजार समिती यांचे सहकार्याने करणेत येत असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे ;

अ) **फळे व भाजीपाल्याकरिता मॉडर्न मार्केटिंग सुविधा (२०)**

| **क्र.** | **मॉडर्न मार्केटिंग सुविधा** | **क्षमता** |
|---|---|---|
| १ | ठाणगाव, ता.सिन्नर, जि.नाशिक | कोल्डस्टोरेज २५मे.टन<br>प्रिकुलिंग ५मे.टन प्रति बॅच<br>अँन्टीचेंबर,प्लँटरूम,ऑफिस,स्टोअररूम<br>पॅकहाऊसएरिया-१५००स्क्वे.फुट<br>इलेक्ट्रिकलवडी.जी.सेट<br>इनपुटशॉप-३<br>वॉटरसप्लाय<br>लॅबोरेटरी<br>प्लॉटडेव्हलपमेंटवर्क्स-अॅप्रोचरोड,कंपाऊंडवॉलइ. |
| २ | लोणी, ता.रहाता, जि.अ.नगर | |
| ३ | शिरपूर, जि.धुळे | |
| ४ | यावल, जि.जळगाव | |
| ५ | पालघर, जि.ठाणे | |
| ६ | शेलपिंपळगाव, ता.खेड, जि.पुणे | |
| ७ | मसूर.ता.कराड, जि.सातारा | |
| ८ | म्हसवड, जि.सातारा | |
| ९ | बार्शी, जि. सोलापूर | |
| १० | तळसंदे , जि.कोल्हापूर | |
| ११ | करमाड , जि.ओरंगाबाद | |
| १२ | घनसावंगी, जि.जालना | |
| १३ | कळमनुरी, जि.हिंगोली | |
| १४ | अर्धापूर ,जि.नांदेड | |
| १५ | माजलगाव, जि.बीड | |
| १६ | चांदूररेल्वे, जि.अमरावती | |
| १७ | देऊळगावराजा,जि.बुलढाणा | |
| १८ | भिवापूर, जि.नागपूर | |
| १९ | मोहाडी, ता.तुमसर, जि.भंडारा | |
| २० | पुलगाव, जि.वर्धा | |

### ब) निर्यात सुविधा केंद्र (७)

| क्र. | निर्यातसुविधाकेंद्र | तपशिल | क्षमता |
|---|---|---|---|
| १ | डाळिंब व द्राक्षे निर्यात सुविधा केंद्र,आटपाडी | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | पॅक हाउस | २००० स्क्वे. फुट |
| २ | केळी निर्यात सुविधा केंद्र,इंदापूर | फार्मपॅकहाउस | संख्या-३ |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | २५ मे.टन |
| | | रायपनींग चेंबर | २५ मे.टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास |
| ३ | कांदा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र,चांदवड | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे.टन |
| | | कांदा चाळीव कांदा प्रतावरी यंत्रणा | |
| ४ | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, खडकेवाके ता. रहाता | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | १५० मे.टन |
| ५ | केशरआंबा निर्यात सुविधा केंद्र,बीड | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे.टन |
| | | रायपनींग चेंबर | ५ मे.टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास |
| | | पॅकहाउस | २००० स्क्वे. फुट |
| ६ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरूड, जि.अमरावती | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे.टन |
| | | पॅकहाउस | २००० स्क्वे. फुट |
| ७ | विकिरण सुविधा केंद्र व भाजीपाला प्रक्रीया केंद्र, वाशी,नवि मुंबई. | शितगृह | १०० मे.टन |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | रायपनींग चेंबर | २० मे.टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास |
| | | विकिरण आंबा | ५ मे.टन प्रतितास |
| | | तृणधान्ये व कडधान्ये | १० मे.टन प्रतितास |
| | | मसाले | १.१ मे.टन प्रतितास |

### क) फुले निर्यात सुविधा केंद्र (४)

| क्र. | निर्यातसुविधाकेंद्र | तपशिल/प्रकल्प | क्षमता/प्रकल्प |
|---|---|---|---|
| १ | तळेगाव,जि.पुणे | प्रशितकरण ( २) | ५ मे. टन. / ६ तास |
| २ | सातारा,जि.सातारा | शितगृह (४) | २५ x ४ = १०० मे.टन |
| ३ | दिंडोरी,जि.नाशिक | | |
| ४ | मुदखेड जि. नांदेड | | |

## कृषक विकिरण सुविधा केंद्र, लासलगाव

अमेरीका देशास भारतीय आंब्यास बाजारपेठ सन २००७ चे आंबा हंगामापासुन उपलब्ध झालेली आहे.यु.एस.डी.ए. चे निकषांन्वये अमेरीका देशास आंबा निर्यातीपुर्वी आंबा फळावर विकीरण प्रक्रीया करणे गरजेचे आहे. त्याकरीता सन २००९ चे आंबा हंगामापासुन कृषि पणन मंडळाने भाभा अणुशक्ती केंद्र, मुंबई व ब्रीट, वाशी यांच्या मालकीचे कृषक विकीरण सुविधा केंद्र, लासलगाव ता.निफाड, जि. नाशिक भाडेत्तत्वावर चालविणेस घेतले असुन सदर सुविधेच्या माध्यमातुन राज्यातील हापुस व केशर या दोन आंबा जातीच्या निर्यातीस अमेरीका देशास निर्यातीचे दालन उपलब्ध झाले आहे. सदर सुविधेचा वापर करुन अहवाल वर्षात खाजगी निर्यातदारांमार्फत २८५ मे.टन एवढा आंब्यावर प्रक्रीया करुन अमेरीका येथे निर्यात करण्यात आला आहे.

तसेच सदर सुविधेवर कांदा व कांदा पावडर विकीरणासए.इ.आर.बी . यांची मान्यता प्राप्त असुन, सदर सुविधेवर खाजगी निर्यातदारांमार्फत ९५.०४ मे.टन कांदा पावडर विकीरण करणेत आलेली आहे.सदर सुविधेचा वापर डाळींबा साठी करण्याचे दृष्टीने डोझमॅपींग करण्यात आले असुन बेदाणा प्रक्रीया करण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

## विकीरण सुविधा केंद्र, वाशी

व मराठवाडा विचारात घेता व आंब्याच्या नाशवंत म्हणुन विचार करता लासलगाव येथील बि.ए.आर.सी यांच्या मालकीची कृषक विकरण सुविधा वाहतुकीच्या दृष्टीने सोईस्कर नव्हती. त्यामुळे निर्यातदारांच्या मागणीनुसार व अपेडाच्या मार्गदर्शनाने कृषी पणन मंडळामार्फत मोठ्या क्षमतेची विकीरण सुविधेची उभारणी वाशी, नवी मुंबई येथे अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वत: चा अतीरीक्त निधी असे एकंदरीत रु.२९ कोटीची गुंतवणुक करुन वापरुन सुविधा उभारणीची कामकाज अंतीम टप्यात असुन AERB, DAE व USFDA यांचे प्रमाणीकरण करणेचे कामकाज प्रगतीपथावर आहे.

## भाजीपाला प्रक्रीया केंद्र, वाशी

युरोपियन युनियनने भारतातुन आयात होणाऱ्या आंबा व पाच भाजीपाल्यावर आयात बंदी केली आहे. या पार्श्वभुमीवर कृषी पणन मंडळाने पुढाकार घेउन अपेडा यांच्या सहकार्याने व कृषी उत्पन्न बाजार समीती मुंबई यांच्या जागेवर वाशी येथे कृषी पणन मंडळामार्फत भाजीपाला प्रक्रीया केंद्राची उभारणी करणेत येत आहे. सदरील सुविधेवर भेंडी,मिरची,कारले,वांगी व ईतर भाजीपाला यावर हॉट वॉटर प्रक्रीया करण्यात येउ शकणार आहे. तसेच सदरील सुविधेवर प्रीकुलींग व कोल्डस्टोरेजची सुविधा देखील उभारण्यात आली आहे. सदर सुविधा वाशी येथे असल्याने ही सुविधा युरोपियन देशांमध्ये भाजीपाला निर्यात वृध्दीसाठी विशेष महत्वाची ठरणार आहे.

## व्हेपर हिट ट्रिटमेंट सुविधा, वाशी

जपानच्या व न्युझिलंड या बाजारपेठात आंबा पाठविण्यासाठी त्यावर व्हेपर हीट ट्रिटमेंट करणे अत्यावश्यक असून सदर सुविधा सद्यस्थितीत महाराष्ट्रामधे फक्त पणन मंडळाकडे उपलब्ध आहे.जपान येथे आंब्याची निर्यात करण्यासाठी कृषी पणन मंडळामार्फत अपेडा, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने सन १९९९-२००० मध्ये सुमारे रु. ४.०० कोटी खर्चाच्या व्ही.एच.टी.सुविधेची वाशी, नवी मुंबई येथे उभारणी करण्यात आलेली आहे. मागील

वर्षी.व्ही.एच.टी. सुविधा केंद्रातील उपलब्ध सुविधांचा वापर करुन ४६ मे.टन आंब्यावर प्रक्रीया करण्यात आली असुन ४२ टन आंबा न्युझिलंड च्या बाजारपेठेत निर्यात करण्यात आला आहे. सदर सुविधा केंद्राचे युरोपीय देशाना निर्यातीसाठी अपेडामार्फत प्रमाणिकरण करण्यात आले असुन या सुविधा केंद्रांतुन खाजगी निर्यातदारांमार्फत सन १३ -१४ मध्ये ६८४ मे.टन कारल्यावर प्रक्रीया करुन निर्यात करण्यात आली आहे.

## ग्लोबलगॅप प्रमाणपत्र

युरोपिय देशाना निर्यात करावयाची झाल्यास गॅप प्रमाणपत्र अत्यावश्यक असते. गॅप प्रमाणपत्र प्राप्त करणे बाबत फलोत्पादन विकास अधिकारी प्रत्यक्ष शेतावर भेटी देऊन माहिती देतात व आवश्यक बाबींची पूर्तता करुन घेऊन ग्लोबलगॅप प्रमाणपत्र प्राप्त करुन दिले जाते.आजअखेर २८५ शेतक-यांना ग्लोबलगॅप प्रमाणपत्र प्राप्त असुन अहवाल वर्षात ४ शेतकऱ्यांना ग्लोबलगॅप प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. त्यासाठी प्रमाणिकरण योजनेचे माध्यमातुन शुल्काच्या ५० टक्के रक्कम कृषि पणन मंडळाकडुन अनुदान म्हणुन अदा करण्यात येते. चालु वर्षी योजना राबविणेचे दृष्टीने नियोजन करण्यात आले असुन शेतक-यांना मार्गदर्शन करण्यासाठी सर्व जिल्हा पणन व्यवस्थापक यांचे २ दिवसीय मास्टर्स ट्रेनर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा पणन व्यवस्थापक यांचे मार्फत ग्लोबलगॅप प्रमाणीकरण योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## आंबा व काजू मंडळाची स्थापना

भारतात आणि महाराष्ट्रात आंबा व काजू पिकाखालील क्षेत्र जरी वाढत असले तरी यापिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. तसेच या पिकाची काढणी पश्चात हाताळणी आणि प्रक्रिया यामध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी शिफारशी नुसार शास्त्रिय दृष्टिने करणे गरजेचे आहे.त्यासाठी राज्यातील आंबा व काजू उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी राज्यपातळीवर एक आंबा व काजु मंडळअसणे आवश्यक असल्याने शासन निर्णय दि.०६/१०/२०१३ व २४/०१/२०१४ रोजी महाराष्ट्र राज्य आंबा व काजु मंडळ स्थापन करणेत आले आहे. आंबा व काजु मंडळाचे रत्नागीरी येथे कार्यालय सुरु करण्यात आले असुन तेथे आंबा काजु मंडळाचे कामकाज सुरु करणेत आले आहे.

## मार्केट फॅसिलिटेशन सेंटर, दुबई

हाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने दि. २२/०२/२०१३ रोजी दुबई येथे जेबेल अली फ्रि झोन एरियामधील एलओबी १२ याजागेमध्ये मार्केट फॅसिलिटेशन सेंटर सुरू केलेले आहे.दि.२५ ते २८ फेब्रुवारी २०१३ या कालवधीत दुबई येथे आयोजित गल्फ फुड २०१३ या प्रदर्शनात सहभागी होऊन फळे व भाजीपाल्याच्या आयातदारांशी ताजी फळे व भाजीपाला पुरवठ्याबाबत चर्चा करण्यात आली आहे.मार्केट फॅसिलिटेशन सेंटरच्या नावावर ताजी फळे, भाजीपाला व फुले तसेच प्रक्रियायुक्तपदार्थांची दुबई येथे आयात करणे, साठवणूक, वाहतूक व विक्री अशा स्वरूपाचे ट्रेडिंगचे लायसन्स प्राप्त झाले आहे. तथापी सदर कार्यालयास मिळणारा अल्प प्रतीसाद व वाढता खर्च पाहता दुबई येथील कार्यालय २०/०३/२०१४ रोजी बंद करण्यात आले आहे.

## कांद्याच्या निर्यातीसाठी निर्यातदारांची नोंदणी व नाहरकत प्रमाणपत्र

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत कांद्याच्या निर्यातीसाठी निर्यातदारांची नोंदणी व त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामकाज करण्यात येत आहे. सन २०१३ - १४ या अहवाल वर्षात पुणे, मुंबई आणि नाशिक कार्यालयांकडून देशातील विविध कांदा- निर्यातदारांना मंडळामार्फत सुमारे १९१४ ना-हरकत प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आलेले सेवा शुल्कापोटी पणन मंडळास रक्कम रू.९९.६१ लाख प्राप्त झालेली आहे. माहे एप्रिल २०१३ ते २०१४ या कालावधीत पुणे, मुंबई आणि नाशिक कार्यालयांकडून खालिलप्रमाणे ना-हरकत प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आलेले आहे.

| वर्ष | नाहरकत प्रमाणपत्र संख्या | कांदा निर्यात (हजार मे.टन) | ईनव्हाईस रक्कम (युएसडी लाख ) |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | ६५२ | २२.१४ | १००.६७ |

## निर्यात विभागामार्फत राबविण्यात येणा-या कृषिमाल निर्यात योजना

महाराष्ट्रातून कृषिमालाची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीकोनातून पणन मंडळामार्फत निर्यातीच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्या प्रामुख्याने खालीलप्रमाणे :

१) वैयक्तिक शेतकरी व सहकारी संस्था यांना आयात – निर्यात परवाना काढून देणे तसेच अपेडा नोंदणी करुन देणे.

२) देशनिहाय व उत्पादननिहाय परदेशातील आयातदारांची यादी उपलब्ध करुन देणे.

३) विविध देशांमध्ये कृषि मालाची निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेल्या क्वालीटी स्टँडर्डस बाबत, पॅकींगबाबत तसेच त्या देशातील आयात कराबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे.